# अधिसूचना

विधि व न्याय विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक:- २६ जून, २०२४

**क्रमांक:- संकीर्ण-११२४/६७१/प्र.क्र.६२/का-३:** ज्याअर्थी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ या अधिनियमाऐवजी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अधिनियम १ जूलै, २०२४ पासून लागू होत आहे;

ज्याअर्थी, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.न्यायामुर्तींची समिती स्थापन केली होती. सदर समितीने त्यांचा प्राथमिक अहवाल मा.मुख्य न्यायामुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना सादर केला असून, त्यामध्ये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील तरतूदीनुसार न्यायिक अधिकाऱ्यांच्या पदनामात बदल करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार सदर शिफारस अंमलात आणण्याचे निर्देश मा.मुख्य न्यायामुर्ती,उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिले आहेत.;

त्याअर्थी, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी गठीत केलेल्या मा.न्यायामुर्तींच्या समितीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील तरतूदीनुसार केलेल्या शिफारशीस अनुसरुन मुख्य महानगर दंडाधिकारी, अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, महानगर दंडाधिकारी व सहायक सत्र न्यायाधीश या न्यायिक अधिकाऱ्यांच्या पदनामात खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | फौजदारी प्रक्रिया संहिता पदनाम | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ नुसार नवीन पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य महानगर दंडाधिकारी (Chief Metropolitan Magistrate) | मुख्य न्यायदंडाधिकारी (Chief Judicial Magistrate) |
| २ | अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी (Additional Chief Metropolitan Magistrate) | अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (Additional Chief Judicial Magistrate) |
| ३ | महानगर दंडाधिकारी (Metropolitan Magistrate) | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (Judicial Magistrate(First Class)) |
| ४ | सहायक सत्र न्यायाधीश (Assistant Sessions Judge) | अतिरिक्त सत्र न्यायाधीश (Additional Sessions Judge) |

उक्त प्रमाणे पदनामातील बदल दि.०१.०७.२०२४ रोजी पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( महेंद्र रा.जाधव )**
**उप विधि सल्लागार-नि- उप सचिव, महाराष्ट्र शासन**

-------

**क्रमांक:- संकीर्ण-११२४/६७१/प्र.क्र.६२/का-३:**
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक:- २६ जून, २०२४

प्रति,

१.मा.महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई.
२.महालेखापाल- १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
४.सर्व कार्यासने, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५.निवडनस्ती.